# आज शैक्षणिक तर सोमवारी जिल्हा बंदची हाक

## नराधम विजय पवारला बळ देणारे आका शोधा

## विजय पवार आ.संदीप क्षीरसागरांचा राईट हॅण्ड;डॉ.योगेश क्षीरसागरांचा गंभीर आरोप

### क्लासेसच्या गेटला काळे फासले





बीड (सरकार): राज्यात गेल्या काही महिन्यांपासून गुंडगिरी आणि गुन्हेगारीच्या मुद्द्यावरुन चर्चेत असलेल्या बीडमध्ये दररोज नवनवे प्रकार समोर येत आहेत. कधी मारहाण, कधी दहशत पसरवण्याचा प्रकार, कधी रिल्स, तर कधी बँकेच्या फसवणुकीमुळे कर्जबाजारीमुळे आत्महत्यासारख्या धक्कादायक घटना घडल्या आहेत. त्यातच, आता बीडमध्ये अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यावरुन, विविध पक्ष संघटना आणि पालक आक्रमक झाले असून बीड बंदची हाक देण्यात आली आहे. याबाब पोलिसांना निवेदनही देण्यात आलं आहे. संबंधित घटनेतील आरोपी शिक्षकाला अटक करण्याच्या मागणीसाठी, तसेच आरोपींना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी करत सोमवारी बीड बंदची हाक देण्यात आली आहे.

बीडमधील अल्पवयीन मुलीच्या लैंगिक अत्याचार प्रकरणी आंदोलकांनी पोलीस तपास यंत्रणेला आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले आहे. या प्रकरणातील दोन शिक्षक अद्याप फरार असून फरार शिक्षकांना अटक करण्याच्या मागणीसाठी पक्ष संघटना आणि पालकांनी क्लासेसच्या गेटला लावण्यात आलेल्या आरोपी शिक्षकांच्या फोटोला काळे फासून ठिय्या मांडला. दरम्यान पोलीस अधीक्षक कार्यालयात वरिष्ठ अधिकार्यांची भेट घेतली. या प्रकरणातील दोन फरार शिक्षकांना अटक न केल्यास सोमवारी बीड बंदची हाक देण्यात आली.

या प्रकरणातील आरोपींना राजकीय पाठबळ असल्याने ते फरार होण्यास यशस्वी झाले. आरोपींना अटक करून क्लासेसच्या इमारतीला सील ठोकावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.




सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar




(छाया: कृष्णा शिंदे)


बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २७३ वा ■ शनिवार २८ जून २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक २९ जून २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 273 ■ Saturday 28 June 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027



# मंत्र्याचे नाव घेऊन गेवराईच्या तहसीलदाराची तक्रारदाराला धमकी

## शाम रोकडेची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार;मंत्र्याच्या नावाची बदनामी करण्याचा प्रयत्न होतोय का?



गेवराई (सरकार): तालुक्यातील रेवकी गावात ११०० ब्रास वाळू चोरी प्रकरणाने खळबळ उडाली आहे. स्थानिक नागरिक शाम गणेश रोकडे यांनी थेट तहसीलदार संदीप खोमणे यांच्यावर संगनमताने वाळू चोरीचा आरोप करत जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहिले आहे. या प्रकरणी तातडीने निलंबनाची कार्यवाही न झाल्यास पालकमंत्री अजित पवार यांच्या समोर आत्मदहन करण्याची धमकी शाम रोकडे यांनी दिली आहे.

शामरोकडे यांच्या अर्जानुसार, रेवकी येथील ११०० ब्रास वाळूचा शासकीय पंचनामा झाला असताना तहसीलदार खोमणे यांच्या सहकार्याने ही वाळू गायब झाली.



खोमणे यांना विचारणा केल्यास त्यांनी उर्मटपणे, ही वाळू तुझ्या बापाची आहे का? असे म्हणत रोकडेंना कार्यालयातून हाकलून दिले. एवढेच नव्हे, तर माझे पाहुणे दत्ता मामा भरणे मंत्री आहेत,ते तुला रातोरात गायब करतील, अशी धमकीही दिली.या प्रकरणाने बीड जिल्ह्यातील वाळू माफियांचे बस्तान उघड झाले आहे. तहसीलदारांसारख्या जबाबदार अधिकाऱ्याचाच चोरीत सहभाग असेल, तर सामान्य नागरिकांचे काय? रोकडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह मुख्यमंत्री, महसूलमंत्री, विभागीय आयुक्तांना पत्र पाठवून तातडीने कारवाईची मागणी केली आहे. वाळू चोरीच्या या काळ्या कारनाम्याने प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तहसीलदारांवर कारवाई होणार की रोकडेंना न्याय मिळणार? हा प्रश्न अनुत्तरित आहे!



## परळीत सहा महिन्यांनंतर मटका-बिंगो पुन्हां जोरात सुरू


### पोलीस अधीक्षक,अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या सूचना द्या

परळी (सरकार): बीड जिल्हयात नवीन आय पी एस नवनीत कावंत हे पोलीस अधीक्षक म्हणून रुझु झाले असता परळी शहरातील अवैध धंदे बंद झाले होते त्यात मटका हा जुगार तर पूर्ण पणे बंद झाला होता मात्र आता सहा महिन्यांत मटका जोमात सुरू झाला असून पूर्ण परळी शहरात ग्लोगल्ली मुख्य रस्ता अनेक भागात मटका जोमात सुरु झाला आहे याचे कारण अध्यप स्पष्ट नाही झाले कुटून यांना आशीर्वाद भेटला जेणेकरून मटका एवढा अचानक पणे सुरू केला आहे याची चर्चा परळीत जोरात सुरु झाला आहे कोण असेल याला जवाबदार ,परळी पोलिस काय करत आहेत ,का कारवाई होत नाही गरिबांचे संसार रत्यावर येत आहेत अनेक तरुण या मटक्याच्या आहारी जाऊन आपले जीवन संपवत आहेत याकडे कोन लक्ष देणार तेव्हा पोलीस अधीक्षक साहेब आपण स्वतः लक्ष देऊन रुझु झालात तेव्हा पूर्ण शहरातील मटका बंद केला होता तसाच आता आपल्याकडून परळी जनतेला आशा आहे आपण परळी शहरातील मटक्यावर कारवाई करून तो पूर्णपणे बंद करून तरुण गरिबांचे संसार वाचववा अशी अपेक्षा आपल्या कडे करत आहेत.



## ग्राहकांची बिले परळी नगरपालिकेच्या नावावर टाकली;३९ लाखांचा अपहार,२ अभियंते निलंबित

बीड (सरकार):ऐकावं ते नवलच असा प्रकार आता बीड जिल्ह्याच्या बाबतीत पुढे येत आहे. येथील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकारानंतर बीडमधील दहशत,गुंडगिरी आणि पोलीस व प्रशासनातील काही अधिकाऱ्यांची मनमानी सातत्याने पुढे येत होती. तसेच, विविध ठेकेदारी, राख माफिया, टँकर माफिया, टिप्पर माफियांचेही कारनामे समोर आले होते. त्यानंतर, प्रशासनातील एका अधिकाऱ्याचा प्रताप समोर आला असून या महाशयांनी चक्क ३९ लाख रुपयांचा अपहार वीजबिलात केल्याचं उघडकीस आलं आहे. याप्रकरणी महावितरणने दोघांवर निलंबनाच कारवाई करण्यात आली आहे.



बीडच्या परळीमध्ये खासगी ग्राहकांच्या घरची बिले नगरपरिषदेच्या नावावर टाकून त्याद्वारे रक्कम जमा करत ३९ लाख रुपयांचा अपहार झाल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते ब्रह्मदेव चाटे यांनी महावितरणकडे केली होती. त्यानंतर, आता महावितरणने या तक्रारीची दखल घेत विभागातील रत्नदीप कटके व प्रशांत आंबडकर या दोन अभियंत्यांना निलंबित केले आहे. आंबडकर आणि कटके यांच्या आयडीवरुन पोर्टलवर सदरील सर्व प्रकार करण्यात आल्याचे निलबंन पत्रात नमूद केलेले आहे. त्यानंतर महावितरणकडून ही कारवाई करण्यात आली.तसेच आता या प्रकारात आणखी कोणी सहभागी आहे का? याची देखील चौकशी केली जात असून जे अधिकारी कर्मचारी या प्रकारात दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाणार असल्याचे संकेत बीड येथील अधीक्षक अभियंता राजपूत यांनी दिले आहेत.

## ३० जून ते १८ जुलै पर्यंत पावसाळी अधिवेशन

मुंबई (सरकार) राज्याच्या विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन ३० जून ते १८ जुलै या कालावधीत पार पडणार आहे. अधिवेशनाच्या



पूर्वसंध्येला चहापान कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या चहापानाला विरोधक जाणार की नाही याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

विरोधकांकडून नेहमीच या चहापानावर बहिष्कार टाकला जातो. दरम्यान, या अधिवेशनात काही महत्त्वाचे आणि वादग्रस्त विषय गाजण्याची शक्यता आहे. त्यात हिंदी भाषेची सक्ती, शक्तीपीठ महामार्ग प्रकल्प आणि शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दा विरोधक उपस्थित करतील. यामुळे सरकारची डोकेदुखी वाढू शकते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यात त्रिभाषा धोरणाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. पहिल्यापासूनच विद्यार्थ्यांना तीन भाषा शिकवण्यात येणार होत्या. यात हिंदी भाषेची सक्ती करण्यावरून वाद निर्माण झालाय. राज्यातील विरोधी पक्षांसह मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही सरकारच्या निर्णयाला जोरदार विरोध केलाय. या पार्श्वभूमीवर शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी राज ठाकरे यांची भेटही घेतलीय.

## गावठी दारू विकणारी महिला माजलगावात पकडली

माजलगाव (सरकार) गोपनिय माहीतीच्या आधारे माजलगांव शहर पोलीसांनी माजलगांव शहरातील जुना बाजा रोड भागात सायंकाळी ०७.३० वाजता छापा मारुन तेथे अवैधरित्या गावठी हातभट्टीची चोरटी विक्री करणाऱ्या महिलेला माजलगाव पोलीसांनी शुक्रवारी जेरबंद केले.


सत्यभामा सुरेश मेंडके रा. सय्यदगल्ली माजलगांव हीचे ताब्यातुन गावठी हातभट्टीची तयार ३० लिटर दारू तसेच गावठी दारु तयार करण्यासाठी उपयोगात येणारे २०० लिटर रसायण, तसेच दारु व रसायण ठेवण्यासाठी वापरात असलेले प्लास्टीकचे व लोखंडी ड्रम असा एकुण ३७,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन नमुद महलेविरुध्द गु.र.नं. २३७/२०२५ कलम ६५ (ई), (फ) महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई नवनीत कॉंवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, निरव राजगुरु, उपविभागीय पोलीस अधिकारी, गेवराई अति.पदभार उपविभाग माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक संदिप राठोड, पोहेकॉ / किशोर जाधव, पोलीस अंमलदार शिवगणेश मिरकले, महीला पोलीस अंमलदार स्नेहल परदेशी यांनी केली आहे.

## माजलगावात अवैध गुटख्यावर पोलिसांचा छापा

माजलगाव (सरकार): येथे अवैधरित्या गुटखा बाळगुन चोरटी विक्री करणाऱ्यावर माजलगांव शहर पोलीसांनी २७ जून रोजी छापा मारून एकाला जेरबंद केले.

शुक्रवार दि.२७ रोजी गोपनिय माहीतीच्या आधारे माजलगांव शहर पोलीसांनी माजलगांव शहरातील जुना मोंढा भागातील न्यु तुळजाभवानी ट्रेडर्स किराणा दुकानावर रात्री ०८.२० वाजता छापा मारुन नमुद दुकानातुन महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला राजनिवास, जाफरानी जर्दा, डायरेक्टर, आरएमडी, हिरा पानमसाला, गोवा असा वेगवेगळ्या



कंपनीचा ३९६१६/- रुपये किमतीचा गुटखा व एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल असा एकुण ५४६१६/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन सदर गुटखा स्वत:च्या ताब्यात बाळगुन चोरटी विक्री करणारा संजय शिवाजीराव होके वय ३४ वर्षे रा. पाटील गल्ली माजलगांव ता. माजलगांव जि.बीड तसेच इतर एका विरुध्द गु.र.नं. २३८/२०२५ कलम १२३,२७४, २७५, ३ (५) भारतीय न्याय संहीता प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, नीरव राजगुरु, उपविभागीय पोलीस अधिकारी, गेवराई अति. पदभार उपविभाग माजलगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, सहा.पोलीस निरीक्षक प्रल्हाद मुंडे, पोलीस अंमलदार अंगद घोडके, महादेव बहीरवाळ यांनी केली आहे.

## संपादकीय

# नारीशक्तीची डिजिटल भरारी

पूर्वी डिजिटल साक्षरता मोठ्या शहरांपर्यंतच मर्यादित होती, मात्र तिची व्याप्ती कमी होती आणि ग्रामीण महिलांसाठी तर तंत्रज्ञान नावाची एखादी गोष्टच अस्तित्वात नव्हती. मात्र डिजिटल इंडिया मिशनअंतर्गत सुरू केलेल्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे हे चित्र पूर्णपणे बदलले आहे. विशेषतः २०१७ मध्ये प्रधानमंत्री ग्रामीण डिजिटल साक्षरता अभियान या योजनेने कोट्यवधी ग्रामीण महिलांना डिजिटल स्वरूपात सक्षम केले आहे. आता त्या स्मार्टफोन, इंटरनेट आणि डिजिटल साधनांच्या माध्यमातून सरकारी योजना, बँकिंग सेवा, टेलिमेडिसिन आणि इतर सुविधांचा थेट लाभ घेत आहेत. या अभियानांतर्गत ६ कोटींहून अधिक लोकांना प्रशिक्षित करण्यात आले आहे,

२०१४ मध्ये सुरू झालेली प्रधानमंत्री जन धन योजना, जी जनधन, आधार, मोबाईल यांच्या त्रिसूत्री सोबत मिळून जगातील सर्वात मोठा आर्थिक समावेशन कार्यक्रम बनली आहे. तिने भारतात आर्थिक सक्षमीकरणाची नवी गाथा लिहिली आहे. पूर्वी जिथे कोट्यवधी महिलांकडे बँक खाती सुद्धा नव्हती आणि सरकारी लाभाचे पैसे मध्यस्थांच्या हातात जात होते, तिथे आता जनधन, आधार आणि मोबाईलच्या त्रिसूत्रीने आर्थिक समावेशनाला एक नवी दिशा दिली आहे. या डिजिटल क्रांतीमुळे महिला थेट लाभ हस्तांतरण प्रक्रियेद्वारे थेट त्यांच्या बँक खात्यांमध्ये सरकारी योजनांचा लाभ मिळवत आहे.

**डिजिटल कौशल्य आणि भविष्याची तयारी**

तंत्रज्ञान-आधारित मंचांनी शिक्षण आणि रोजगाराच्या क्षेत्रात महत्त्वाचे बदल घडवले आहेत. स्किल इंडिया मिशन आणि ई-स्किल इंडियासारख्या कार्यक्रमांमुळे लाखो मुलींना आणि महिलांना आता त्यांच्या मोबाईलवर प्रशिक्षण मिळत आहे. यामुळे त्या उत्तम कौशल्ये शिकून स्वावलंबी बनत आहेत आणि रोजगाराच्या नवीन संधी प्राप्त करू शकत आहेत. हा बदल पूर्वीची मर्यादित संसाधने आणि पोहोच यापेक्षा खूपच जास्त व्यापक आणि सशक्त आहे. डथ-ध-च् आणि ऊखघडक- सारख्या पोर्टल्सनी महिलांना शिक्षणाशी जोडण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे, विशेषतः कोरोना महामारीच्या काळात जेव्हा संपूर्ण जग थांबल्यासारखे झाले होते. आता महिला आणि बाल विकास मंत्रालय आणि कौशल्य विकास मंत्रालय यांच्या संयुक्त उपक्रमांतर्गत १९ राज्यांमधील २७ जिल्ह्यांमध्ये किशोरवयीन मुलींना डिजिटल साक्षरतेसोबतच रोजगारभिमुख प्रशिक्षण दिले जात आहे.

**डिजिटल युगात महिला उद्योजकतेला नवे बळ**

एक काळ होता, ज्यावेळी महिलांचे लहान व्यवसाय घराच्या चार भिंतींपुरतेच मर्यादित होते आणि बाजारापर्यंत पोहोचणे हे एक मोठे आव्हान होते. पण, गेल्या काही वर्षांत महिलाप्रणीत स्टार्टअप्स आणि लघू उद्योगांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. सोशल मीडिया, डिजिटल मार्केटिंग आणि ऑनलाइन पेमेंट प्रणालीने त्यांना एक उद्योजक म्हणून पुढे जाण्याचा आणि स्वतःचा ब्रँड तयार करण्याचा आत्मविश्वास दिला आहे.

**आरोग्य, पोषण आणि सुरक्षेत तंत्रज्ञानाची भूमिका**

पोर्टल आणि शडरपक्षशर्शीरपळ यांसारख्या डिजिटल साधनांनी माता आणि मुलांशी संबंधित आरोग्य सेवांच्या देखरेखीला अत्यंत सोपे आणि प्रभावी बनवले आहे. आता अंगणवाडी सेविका आणि आशा भगिनी मोबाईल ॲप्सच्या मदतीने लाभार्थींची देखरेख, अहवाल देणे आणि सेवा वितरणाचे काम सहजपणे करू शकत आहेत. मोदी सरकारने एठडड-११२, पॅनिक बटण आणि महिला सुरक्षा ॲप्स यांसारख्या प्रभावी उपायांची अंमलबजावणी केली आहे, ज्यामुळे आता महिला सार्वजनिक ठिकाणी स्वतःला पूर्वीपेक्षा अधिक सुरक्षित मानत आहेत.

विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित यामध्ये महिलांची भागीदारी विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित यांसारख्या क्षेत्रांमध्ये मुलींचा सहभाग एकेकाळी मर्यादित मानला जात होता, पण आता परिस्थिती वेगाने बदलत आहे. विज्ञान ज्योती आणि थखडए-घखठ-छ योजनांसारखे उपक्रम विद्यार्थिनींना डढएच् क्षेत्रांमध्ये आगेकूच करण्यासाठी प्रेरित करत आहेत. भारतीय महिला आता अंतराळ संशोधन, कृत्रिम प्रज्ञा आणि जैवतंत्रज्ञानासारख्या क्षेत्रांमध्ये अग्रगण्य भूमिका बजावत आहेत.

**विकसित भारताच्या दिशेने पडणारी पावले**

२०१४ मध्ये, ज्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली देशात एका निर्णायक बदलाची सुरुवात झाली, तेव्हापासून भारताने डिजिटल प्रगतीची एक नवीन दिशा निश्चित केली. या ११ वर्षांत 'डिजिटल इंडिया मिशन' सारख्या लोक-केंद्रित मोहिमांनी कोट्यवधी नागरिकांच्या जीवनावर प्रभाव टाकला आहे. विशेषतः महिलांसाठी हे परिवर्तन आत्मनिर्भरता, सक्षमीकरण आणि सन्मानाच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल ठरले आहे. आजच्या २१व्या शतकात तंत्रज्ञान केवळ प्रशासन आणि अर्थव्यवस्थेमध्येच नाही, तर सामाजिक रचनेतही बदल घडवत आहे आणि या बदलाचे सर्वात सशक्त उदाहरण म्हणजे त्या महिला आहे. ज्या डिजिटल युगात नवीन संधींसह नवी भरारी घेत आहे.

# बालगुन्हेगारी: मानसिक स्थिती आणि विकृती...



आजकाल लहान मुले आणि तरुण पिढीमध्ये गुन्हेगारीची वाढती प्रवृत्ती, अवैध शस्त्रांची सहज उपलब्धता आणि अमली पदार्थांचे वाढते व्यसन ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. या प्रश्नांची सखोल माहिती घेणे, त्यांची कारणे समजून घेणे आणि त्यावर प्रभावी उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. लहान मुलांची मानसिकता, त्यातील विकृती आणि भावनिक अस्थिरता हाही एक महत्त्वाचा मुद्दा आहे. तरी या लेखातून आपण यामागील कारणे, उपाययोजना यावर प्रकाश झोत टाकणार आहोत.

भावनिक अस्थिरता आणि मानसिक विकृती : हा एक लक्षात घेण्यासाठी महत्त्वाचा मुद्दा आहे. काहीवेळा भावनिक अस्थिरता, मानसिक आजार किंवा व्यक्तिमत्त्व विकृती यांमुळे व्यक्ती हिंसक होऊ शकते आणि शस्त्रांचा वापर करू शकते. समूह मानसिकता टोळी किंवा गटाचा भाग असताना, गटाच्या दबावाखाली किंवा गटाची निष्ठा सिद्ध करण्यासाठी तरुण हिंसक कृत्ये करण्यास तयार होतात.

**सहानुभूतीचा अभाव :** इतरांच्या भावना आणि वेदनांची जाणीव नसणे किंवा त्याकडे दुर्लक्ष करणे, कोणाचीही दया न येणे, कसलीच तमा न वाटणे हे हिंसक वर्तनाचे एक महत्त्वाचे कारण आहे. हिंसक चित्रपट, व्हीडिओ गेम्स आणि सोशल मीडियावरील हिंसक दृश्यांचा तरुणांच्या मनावर खोलवर परिणाम होतो. यातून त्यांना हिंसेबद्दल आकर्षण वाटू शकते किंवा हिंसक वर्तन सामान्य वाटू शकते, मारामारी, खून, शारीरिक नुकसान, रक्तपात, डेड बॉडी याबद्दलची त्यांची नजर मरून जाते.

बालपणीचे वाईट अनुभव गाठीशी असल्यास मुलं बाहेरील चुकीच्या व्यक्ती, प्रवृत्तीकडे लवकर आकर्षित होतात. कौटुंबिक हिंसाचार, दुर्लक्ष किंवा इतर वाईट अनुभवांमुळे मुलांच्या मनात राग, द्वेष आणि असुरक्षिततेची भावना निर्माण होते, जी पुढे जाऊन हिंसक वर्तनात बदलू शकते. आपल्या घरात, कुटुंबात, आयुष्यात काहीच चांगलं सुरू नाहीये, आजूबाजूच्या परिसरात पण सातत्याने भांडणे, शिवीगाळ, हाणामारी, आजारपण पाहून या मुलांचा आयुष्यातील सकारात्मक भावनांवरील विश्वास निघून जातो. यावर आपण काय उपाययोजना करणे आवश्यक आहे याचा वेध घेतला असता, बाल गुन्हेगारी, शस्त्रांचा वापर आणि अमली पदार्थांचे व्यसन या समस्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी व्यापक आणि बहुस्तरीय उपाययोजना करणे आवश्यक आहे. कौटुंबिक स्तरावर पालकांनी मुलांशी संवाद साधणे, मोकळा संवाद साधणे, त्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे महत्त्वाचे आहे. सकारात्मक आदर्श घालून देणे महत्त्वाचे आहे. पालकांनी स्वतः मुलांसमोर चांगले आदर्श ठेवणे, वेळेवर गांभीर्याने कोणत्याही घटनेकडे लक्ष देणे, मुलांच्या सवयी, मित्र-संगत आणि त्यांच्या वागणुकीतील बदलांवर पालकांनी बारीक लक्ष ठेवणे गरजेचे आहे. मुलांना लहानपणापासूनच नैतिक मूल्ये, योग्य-अयोग्य यातील फरक आणि इतरांप्रती सहानुभूती शिकवावी.

शैक्षणिक स्तरावर जागरूकता कार्यक्रम राबवणे, शाळा आणि कॉलेजांमध्ये शस्त्रांचे आणि अमली पदार्थांचे दुष्परिणाम, कायदेशीर बाबी आणि मानसिक आरोग्याविषयी नियमितपणे जागरूकता कार्यक्रम आयोजित करणे, सल्ला आणि मार्गदर्शन केंद्रे यांची मदत घेणे खूप महत्त्वाचे आहे. शाळा-कॉलेजांमध्ये समुपदेशन आणि मार्गदर्शन केंद्रांची स्थापना करून विद्यार्थ्यांना मानसिक आधार द्यावा. शैक्षणिक संस्थांमध्ये सकारात्मक आणि सुरक्षित वातावरणाची निर्मिती करावी, जिथे विद्यार्थी स्वतःला व्यक्त करू शकतील.

सामाजिक स्तरावर सुद्धा या मुलांसाठी अनेक प्रयत्न केले जावू शकतात. सामाजिक संस्था आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग यामध्ये मदत करू शकतो. या क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक आणि स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या माध्यमातून जनजागृती आणि व्यसनमुक्तीचे कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे.

सार्वजनिक ठिकाणी, शाळा, कॉलेज परिसर आणि तरुणांच्या इतर गर्दीच्या ठिकाणी पोलीस आणि संबंधित यंत्रणांनी कडक नजर ठेवणे, अशा मुलांविरुद्ध आलेल्या तक्रारींची ताबडतोब दखल घेऊन कारवाई करणे, त्यांच्या पालकांना देखील समज देणे यावर भर द्यावा. समाजात यशस्वी आणि सकारात्मक जीवन जगणाऱ्या व्यक्तींना तरुणांसमोर आदर्श म्हणून प्रस्तुत करावे. शिक्षणाच्या, रोजगाराच्या संधी युवकांना मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासकीय पातळीवार, उद्योजक यांच्यामार्फत देण्यात यावी.

कायदेशीर आणि प्रशासकीय स्तरावर कायद्याची कठोर अंमलबजावणी अवैध शस्त्रे आणि अमली पदार्थांशी संबंधित कायद्यांची कठोर अंमलबजावणी करावी. गुन्हेगारांना वेळेवर आणि योग्य शिक्षा व्हावी. अवैध शस्त्रे आणि अमली पदार्थांचे स्रोत उद्ध्वस्त करणे, पोलीस आणि इतर तपास यंत्रणांनी अवैध शस्त्रे आणि अमली पदार्थांचे उत्पादन, तस्करी आणि विक्री करणारे नेटवर्क उद्ध्वस्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. व्यसनाधीन व्यक्तींना योग्य उपचार आणि पुनर्वसनाची सोय उपलब्ध करून द्यावी.

बाल न्याय मंडळाची प्रभावी भूमिका बाल गुन्हेगारांच्या बाबतीत बाल न्याय मंडळाने संवेदनशीलतेने आणि कायद्यानुसार योग्य कारवाई करावी, जेणेकरून त्यांना सुधारण्याची संधी मिळेल. सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण ऑनलाइन माध्यमातून होणाऱ्या शस्त्रांच्या किंवा अमली पदार्थांच्या प्रसारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सायबर पोलिसांना अधिक सक्षम करावे. या समस्यांवर मात करण्यासाठी पालक, शिक्षक, समाज, शासन आणि स्वतः तरुण पिढी या सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. योग्य वेळी योग्य हस्तक्षेप आणि मदतीमुळे अनेक तरुणांना चुकीच्या मार्गावर जाण्यापासून वाचवता येऊ शकते आणि त्यांना एक उज्ज्वल भविष्य मिळू शकते.

## वजन कमी करण्यासाठी दही, तुळशीचा रस प्रभावी



दह्यात मिसळून प्यायल्याने वजन कमी होते आणि त्वचेवर चमकही येते

वजन कमी करण्यात कशी मदत होते?

वजन कमी करण्यासाठी दही आणि तुळशीचा रस खूप प्रभावी ठरतो. दह्यामध्ये प्रोबायोटिक्स, कॅल्शियम आणि प्रोटीन मुबलक प्रमाणात असते. हे चयापचय गतिमान करते, ज्यामुळे शरीरातील कॅलरी जलद बर्न होतात. तुळशीचा रस शरीरात जमा झालेले विषारी पदार्थ काढून टाकतो आणि चरबी जाळण्याच्या प्रक्रियेला गती देतो. दररोज रिकाम्या पोटी दही आणि तुळशीचा रस घेतल्याने भूक कमी होते आणि जास्त खाणे टाळता येते.

**कसे वापरावे? :** २ चमचे दही घ्या. त्यात ८-१० तुळशीच्या पानांचा रस घाला. ते सकाळी रिकाम्या पोटी प्या. २. त्वचेच्या ग्लोसाठी फायदेशीर दही आणि तुळस यांचे मिश्रण त्वचेचे आरोग्य देखील सुधारते. दह्यामध्ये लॅक्टिक सिड असते, जे त्वचेला खोलवर स्वच्छ करते आणि त्वचेच्या मृत पेशी काढून टाकते. तुळशीचा रस अँटिऑक्सिडेंट आणि बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ गुणधर्मांनी समृद्ध आहे, ज्यामुळे त्वचेचे डाग आणि मुरुम दूर होतात. याच्या नियमित सेवनाने त्वचेला नैसर्गिक चमक येण्यास मदत होते.

**पचनसंस्थेसाठी फायदेशीर :** दही आणि तुळस यांचे मिश्रण पचनक्रिया सुधारते. दह्यामध्ये असलेले चांगले बॅक्टेरिया पचनशक्ती मजबूत करतात आणि गॅस, बद्धकोष्ठता यासारख्या समस्या दूर करतात. तुळशीचा रस पोटाची जळजळ आणि ॲसिडिटी कमी करतो.

**कसे प्यावे:** जेवणानंतर १ चमचा तुळशीचा रस दह्यात मिसळून सेवन केल्याने पचनक्रिया सुधारते. ५. तणाव कमी करण्यासाठी उपयुक्त तुळशीमध्ये असलेले अनुकूलक गुणधर्म शरीर आणि मनावरील ताण कमी करतात. दही आणि तुळशीच्या सेवनाने शरीरातील कोर्टिसोल (स्ट्रेस हार्मोन) कमी होते, ज्यामुळे मन शांत राहते. हे झोपेची गुणवत्ता देखील सुधारते.

## मनुका महिलांसाठी खूप फायदेशीर आहे!

गोड मनुके दिसायला लहान असले तरी ते खूप फायदेशीर असतात. हे केवळ शरीरातील रक्ताची कमतरता दूर करण्यास मदत करत नाही तर पोषक तत्वांचा खजिना देखील आहे आणि महिलांसाठी अत्यंत फायदेशीर आहे. आरोग्य तज्ञ मनुका एक सुपरफूड म्हणतात, जे असंख्य आरोग्य फायदे प्रदान करते. तज्ज्ञांच्या मते, दररोज सकाळी रिकाम्या पोटी मनुके खाल्ल्याने केवळ शारीरिक आरोग्य सुधारत नाही तर अशक्तपणा देखील बरा होऊ शकतो. मनुका ही सुकी द्राक्षे आहेत, जी पौष्टिक आणि आरोग्यदायी असतात. त्यामध्ये फायबर आणि विशेष घटक असतात, जे शरीराला फायदेशीर ठरतात. जरी त्यात साखरेचे प्रमाण जास्त असले तरी ते रक्तातील साखर हळूहळू वाढवतात, म्हणून त्यांना एक आरोग्यदायी नाश्ता मानले जाते. संशोधनातून असेही दिसून आले आहे की मनुके खाणे आरोग्यासाठी चांगले आहे. मनुका




हे पोषक तत्वांचा खजिना आहे, ज्यामध्ये लोह, पोटॅशियम, कॅल्शियम, व्हिटॅमिन बी तसेच अँटीऑक्सिडंट्स असतात. मनुक्यात भरपूर फायबर असते, जे पचनसंस्थेसाठी देखील खूप चांगले असते. रिकाम्या पोटी मनुका खाल्ल्याने बद्धकोष्ठता दूर होते आणि पोट साफ होते. सकाळी रात्रभर भिजवलेले मनुके खाल्ल्याने पाचक एंजाइम सक्रिय होतात, ज्यामुळे अन्नाचे पचन सोपे होते. आयुर्वेदानुसार, मनुका हे लोहाचा एक उत्कृष्ट स्रोत आहे, जे शरीरातील अशक्तपणा दूर करण्यास मदत करते. हे विशेषतः महिलांसाठी फायदेशीर आहे.

मासिक पाळीच्या वेळी लोहाची कमतरता किंवा इतर समस्यांना तोंड देणाऱ्या महिलांसाठीही मनुका खाणे फायदेशीर आहे. दररोज १०-१२ मनुके खाल्ल्याने हिमोग्लोबिनची पातळी वाढते आणि थकवा आणि अशक्तपणासारख्या समस्या कमी होतात. मनुकामध्ये पोटॅशियम आणि मॅग्नेशियम सारखे खनिजे देखील असतात, जे हृदय निरोगी ठेवण्यास मदत करतात. हे कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित करते आणि रक्तदाब संतुलित ठेवते. हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका कमी होतो. मनुकामध्ये असलेले व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स त्वचेला चमकदार ठेवतात. हे सुरकुत्या, डाग आणि डाग कमी करते. तसेच, मनुकामध्ये असलेले व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि झिंक केसांना मजबूत बनवतात आणि केस गळणे कमी करतात. मनुक्यांमधील कॅल्शियम आणि बोरॉन सारखे घटक हाडे मजबूत करण्यास मदत करतात.

## सर्दी आणि खोकल्यासाठी आरोग्यवर्धक काढा

आले-एक इंच, लवंगा- दोन, तुळशीची पाने-पाच, मध -एक टीस्पून मिरे पूड -एक टीस्पून, पाणी-दोन ग्लास, हळदीचे मूळ-एक इंच

कृती-सर्वात आधी एका पॅनमध्ये दोन ग्लास पाणी घ्या आणि ते उकळी येईपर्यंत गरम करा. आता पाणी उकळू लागले की त्यात तुळशीची पाने,मिरेपूड, लवंग, हळद आणि आल्याचे तुकडे घाला. आता पाणी मध्यम



आचेवर अर्धा ग्लास पाणी शिल्लक राहेपर्यंत उकळवा. जेव्हा अर्धा ग्लास पाणी साहित्यासह शिल्लक राहते तेव्हा ते चाळणीच्या मदतीने एका भांड्यात गाळून घ्या. आता गाळलेल्या काढ्यात एक चमचा मध घाला आणि चमच्याने चांगले मिसळा. आता हे मिश्रण कपमध्ये सर्व्ह करा. तर चला तयार आहे आपला आरोग्यवर्धक काढा रेसिपी.

## विवाहित पुरुषांसाठी हळद अद्भुत फायदेशीर

भारतीय घरांमध्ये हळदीचा वापर मसाल्याच्या स्वरूपात केला जातो. आपण सर्वजण आपल्या भाज्या आणि डाळींमध्ये ते वापरतो. हळद केवळ अन्नाची चव वाढवतेच, पण आरोग्यासाठीही अनेक प्रकारे फायदेशीर आहे. हळदीमध्ये अँटीऑक्सिडंट, अँटी-बॅक्टेरियल, अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटीसेप्टिक गुणधर्म असतात, जे शरीराला अनेक आजारांपासून वाचवतात. हळदीचे सेवन केल्याने शरीर डिटॉक्स होते आणि रोगप्रतिकारक शक्ती देखील वाढते. पण तुम्हाला माहिती आहे का की हळद खाजगी आरोग्यासाठी देखील खूप फायदेशीर आह. अनेक अभ्यासातून असे दिसून आले आहे की हळदीचे सेवन केल्याने पुरुषांमध्ये काम इच्छा देखील वाढते. हळद काम इच्छा वाढवू शकते आणि तग धरण्याची क्षमता देखील वाढवू शकते. हळदीचे नियमित सेवन केल्याने पुरुषांची शक्ती देखील वाढू शकते. चला तर मग जाणून घेऊया हळदीचा से.क्स ड्राइव्हवर कसा परिणाम होतो आणि ते कसे वापरावे -



**हळद इच्छा वाढवू शकते :** हळद औषधी गुणधर्मांनी समृद्ध आहे. आयुर्वेदात याचा वापर मूड बूस्टर म्हणून केला जातो. हळदीमध्ये कर्क्यूमिन असते, जे तणाव, चिंता आणि नैराश्यासारख्या मानसिक विकारांची लक्षणे सुधारण्यास मदत करते. ही सर्व कारणे इच्छा कमी होण्याची असू शकतात. जास्त चिंता किंवा ताणामुळे से.क्स हार्मोन्समध्ये घट होऊ शकते, ज्यामुळे खाजगी जीवनावर परिणाम होऊ शकतो. एका अभ्यासात असे आढळून आले आहे की हळदीचे सेवन केल्याने पुरुषांमध्ये टेस्टोस्टेरॉनची पातळी वाढण्यास मदत होते. याशिवाय, हळद इरेक्टाइल डिसफंक्शन दूर करण्यासाठी देखील प्रभावी ठरू शकते.

**हळदीचे पुरुषांसाठी फायदे:** टेस्टोस्टेरॉनची पातळी वाढवते: हळदीचे सेवन केल्याने टेस्टोस्टेरॉनची पातळी वाढू शकते, ज्यामुळे कामवासना, स्नायू द्रव्यमान आणि हाडांची घनता सुधारते, असे एका अभ्यासात आढळून आले आहे. इरेक्टाइल डिसफंक्शन सुधारते: हळदीचा वापर इरेक्टाइल डिसफंक्शन सुधारण्यास मदत करू शकतो, असे एका अभ्यासात नमूद आहे. प्रोस्टेटचे आरोग्य सुधारते: हळदीचे दाहक-विरोधी गुणधर्म प्रोस्टेटच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहेत, हे एका अभ्यासात स्पष्ट झाले आहे. प्रजननक्षमता सुधारते: हळद शुक्राणूंचे संरक्षण करते आणि त्यांची गुणवत्ता सुधारण्यास मदत करते, असे एका अभ्यासात दिसून आले आहे. रोगप्रतिकारशक्ती वाढवते: हळदीमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतात. उत्तम आरोग्य आणि अनेक फायद्यांसाठी प्या हळदीचा रस पुरुषांनी हळदीचे सेवन कशा प्रकारे करावे. हळद कोमट पाणी किंवा दुधासोबत सेवन करता येते. दररोज रात्री गरम दुधात हळद मिसळून प्यायल्याने पुरुषांची कार्यक्षमता वाढू शकते. जर हळद काळी मिरीसोबत खाल्ली तर त्याचा दुहेरी फायदा होतो.दररोजच्या आहारात हळद वापरावी.

# विशेष वृत्त

## बीड येथे जागतिक ऑलिम्पिक दिन उत्साहात

**बीड :** जागतिक ऑलिम्पिक दिन दि.२३ जून रोजी येथील जिल्हा क्रीडा संकुलात उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून ऑलिम्पिक विर खाशाबा जाधव व मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पन करून रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे शिवछत्रपत्री राज्य क्रीडा पुरस्कारार्थी प्रा. जे.पी. शेळके, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, जेष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात, जया बारगजे, अफरोज, पठाण, नितीन गर्जे आदिंची प्रमुख उपस्थिती होती. प्रा.जे.पी. शेळकेयांनी बीड जिल्हयातील जास्तीत जास्त खेळाडूंनी ऑलिम्पिक स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे मत व्यक्त केले. या प्रसंगी मार्गदर्शन करतांना प्रा.जे. पी. शेळकेयांनी ऑलिम्पिकचा इतिहास व भारतीय खेळाडूंचे ऑलिम्पिकमधील योगदानाबद्दल खेळाडूंना सविस्तर माहिती करून दिली. कार्यक्रमास खेळाडू, क्रीडा संघटक उपस्थित होते. जागतिक ऑलिम्पिक दिनाचे यशस्वी आयोजन होणे कामी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांचे मार्गदर्शनाखाली क्रीडा अधिकारी कालिदास होसूरकर, अनिकेत काळे, सतीश राठोड, अविनाश पाटील, रेवननाथ शेलार, जितेंद्र आराक, धनेश करांडे, प्रिती काळे यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक विद्यागर यांनी केले तर आभार अविनाश पाटील यांनी केले.

## शेतात जाण्यासाठी रस्ता नसल्याने पेरणी खोळंबली

**केज :** शेतीत पेरणी करायला जाण्यासाठी रस्ताच नसल्याने शेती पडीक ठेवण्याची भीती वाटत असल्याने शेतकऱ्यांनी तहसीलदारांना विनंती करूनही रस्ता मिळत नसल्याने आता एका महिला शेतकऱ्यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे. केज तालुक्यातील साळेगाव शिवारातील महिला शेतकरी सुचिता रमाकांत डीकले या शेतकरी महिलेने दि.२० जून शेतकऱ्यांनी दिला आमरण उपोषणाचे इशारा रोजी तहसीदार केज यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, त्यांची साळेगाव शिवारात गट नंबर ५५७ मध्ये शेत जमीन आहे. परंतु त्यांच्या शेताला जाण्यासाठी रस्ता नसल्याने त्यांची पेरणी खोळंबलेली आहे. त्यामुळे शेत जमीन पडीक पडण्याच्या मार्गावर आहे. रस्ता देण्याची मागणी केली असून रस्ता न दिल्यास तहसील कार्यालया समोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान याच मागणीसाठी या भागातील सात शेतकऱ्यांनीही रस्त्यासाठी सामुदायिक निवेदन दिले असून त्यांनी शेतरस्ता तयार करून देण्याची मागणी केली आहे.

## बालविवाह प्रतिबंध जनजागृती कार्यक्रम

**आष्टी :** कडा येथील मोतीलाल कोठारी विद्यालयात बालविवाह प्रतिबंधक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बीड जिल्ह्यामध्ये होणारे बालविवाह बंद व्हावेत यासाठी युनिसेफ आणि बीड जिल्हा प्रशासनाच्या वतीने शाळांमध्ये बालविवाह प्रतिबंध जनजागृती कार्यक्रम घेण्यात येत आहेत. कडा येथील मोतीलाल कोठारी विद्यालयात बालविवाह प्रतिबंध जनजागृतीसाठी पालकांसह विद्यार्थ्यांचे खेळ घेण्यात आले. मुला मुलींना एकत्र बसून त्यांच्यामध्ये बालकांचे हक्क कर्तव्य तसेच वयात आलेल्या मुलांना समजून घेण्यासाठी पालकांची भूमिका काय असावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अंबाजोगाई येथील मनस्विनी विकास सेवाभावी संस्थेच्या वतीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेच्या स्वयंसेवकांनी गाणे खेळ आणि गप्पा यांच्या माध्यमातून विद्यार्थी आणि पालकांना समजावून सांगितले. या कार्यशाळेत विद्यालयाचे मुख्याध्यापक एम ई शिकारे, स्वयंसेविका केदारी, गायकवाड यांच्यासह पालक आणि शिक्षक सहभागी झाले.

## संत विचारांचा अंगीकार करावा : डॉ. क्षीरसागर

**चौसाळा :** संताचे हृदय विशाल असते, त्यांचे विचार हे महान असतात ते आपण आचरणात आणले पाहिजेत असे प्रतिपादन डॉ. योगेश क्षीरसागर यांनी केले. कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे संत गोविंदपंत दिंडी सोहळ्यातील भक्तांसाठी अन्नदान व आरोग्य तपासणी कार्यक्रम आयोजित केला होता त्याप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर काकडे महाराज, काकासाहेब जोगदंड, प्राचार्य डॉ. पंडित खाकरे उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. योगेश क्षीरसागर म्हणाले की, संतानी सत्य, प्रेम, करुणा आणि माणुसकी या मूल्यांना प्राधान्य दिले. विशेष म्हणजे हे विचार त्यांनी सोप्या भाषेत सांगितले. प्रारंभी संत गोविंदपंताचा पालखीचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. पंडित खाकरे म्हणाले की, दरवर्षी या दिंडी सोहळ्यासाठी महाविद्ययालायातर्फे अन्नदान व आरोग्य तपासणी केली जाते. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. विश्वंभर देशमाने, पदयुत्तर संचालक डॉ. सुधाकर वणवे, कमविचे उपप्राचार्य प्रा. गणपती ढवळशंक उपस्थित होते. महाविद्यालयाच्या या सामाजिक कार्याचे परिसरात कौतुक केले जात आहे. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. सुधीर माने यांनी व्यक्त केले. तर आभार प्रा. विलास भिल्लारे यांनी मानले. यावेळी ५० वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

## जाटनांदूर ग्रा.पं. मार्फत शालेय साहित्य वितरित

**जाटनांदूर :** शिरुर तालुक्यातील सर्वात मोठी ग्रुप ग्रामपंचायत जाटनांदूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रामपंचायतच्या सरपंच प्रियंका सचिन माने सरपंचपती सचिन माने, उपसरपंच शरद घायाळ यांच्यासह सर्व सदस्य यांच्या प्रयत्नातून ग्रामपंचायत अंतर्गत जाटनांदूरसह जेधेवाडी, भिलारवाडी, मोरजळवाडी, उखळवाडी, सवसवाडी, चाव्हरवाडी, मुळूकवाडी येथील विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रमाणे मोफत शालेय साहित्य व स्कूल बॅग सर्व शाळांना वाटप करण्यात आले. शाळेच्या गुणवत्तेमध्ये कोणत्याही प्रकारची कमी भासणार नाही याची काळजी सरपंचांकडून घेतली जात असून हे शालेय साहित्य मिळाल्यानंतर चिमुकल्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. यावेळी सर्व शाळेच्या वतीने ग्रा.पं. पदाधिकाऱ्यांचा सत्कार करुन आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी सचिन माने, सोपान मोरे, लालासाहेब शेळके, ग्रामपंचायत सदस्य गणेश जेधे, दिगांबर जेधे, संतोष माने, जावळे, जेधे संतोष इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# छत्रपती राजर्षी शाहू महाराज लोक कल्याणकारी राजे होते - जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर

### राजर्षी शाहू कन्या विद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती व गुणवंत विद्यार्थीनींचा सत्कार संपन्न






**बीड (प्रतिनिधी):-** राजर्षी छत्रपती शाहू महाराज लोककल्याणकारी राजे होते. बहुजनांना शिक्षण, जातिभेद निर्मूलन, नोकर्यांमध्ये आरक्षण आणि स्त्रीमुक्तीसाठी कायदे करणारे सुधारणावादी समाजसुधारक होते. असे प्रतिपादन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले.

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ, बीड संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथ./ माध्य विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज जयंती व दहावी गुणवंत विद्यार्थीनींचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा अधिकारी मा.अरविंद विद्यागर हे होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष बीड जिल्हा हॉकी संघ- दिनकर थोरात, अध्यक्ष टायगर ग्रुप बीड- राकेश जाधव, संस्थेचे अध्यक्ष इंजि.बलभिमराव जाहेर पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.बी आर.पंडीत, सचिव प्रा.जे.पी. शेळके,संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. ए.आर.पाटील,सहसचिव प्रा.व्ही.एल.जोगदंड,संचालक ऋषिकेश शेळके , संचालक विश्वनाथराव माणूसमारे, संचालक प्रा. ए.आर.डंबरे, ऋषिकेश पाटील, मु.अ.एस.डी. कदम,मु.अ.आर.टी.राऊत, प्राचार्या. आर.डी. लोखंडे, शिंदे मामा ,साबळे मामा, इरफान भाई,सिराज भाई यांची उपस्थिती होती. सर्व प्रथम राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करून विद्यार्थीनींच्या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक मु.अ. एस. डी. कदम यांनी संस्थेची स्थापना व शिक्षक वृंद व विद्यार्थिनी बद्दल माहिती सांगितली.

संस्थेचे सचिव प्रा .जे.पी .शेळके यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन सांगितले की, तुम्ही केलेल्या अभ्यासाचे फळ तुम्हाला आज मिळाले असले तरी गुणवंत होण्यापेक्षा गुणवान, कीर्तीवान होणे गरजेचे आहे. सध्याचे युग स्पर्धेचे युग असून पुढील शिक्षण घेतांना यश, अपयश येत राहील परंतु त्याला खचून न जाता जिद्द, चिकाटीने ध्येय गाठून आपल्या पायावर उभे राहा असे मौलिक सल्ला त्यांनी विद्यार्थीनींना दिला.

अध्यक्षीय भाषणात जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर म्हणाले राज्य शासनाच्या क्रीडा विषयक विविध योजना व उपक्रमांची सविस्तर माहिती विद्यार्थीनींना दिली. खेळाच्या माध्यमातूनही नोकरीच्या संधी उपलब्ध होत असतात. खेळाडूंकरीता शासन सर्वोतोपरी योजना राबवित असते. आपल्या कला गुणांना ओळखून क्रीडा क्षेत्रातूनही आपले भवितव्य घडवता येते असे सांगून त्यांनी नोकरीच्या संधी कोणकोणत्या क्षेत्रात असते याची माहिती देवून क्रीडा योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थीनींना केले.सर्वसामान्य, उपेक्षित, दलित, वंचित, बहुजन यांचे उध्दारक म्हणून सर्व परिचित असलेले छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे खर्या अर्थाने बहुजनांचे भाग्यविधाते होते असे सांगून त्यांनी महाराजांच्या जीवन कार्याची विविध पैलू उपस्थितांसमोर मांडले. यावेळी संस्थेचे सहसचिव प्रा.व्ही.एल. जोगदंड यांनी देखील राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याची माहिती आपल्या भाषणातून दिली. यावेळी दहावीतील गुणवंत विद्यार्थीनींना मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ व रोख रक्कमेची बक्षीसे देण्यात आली. तसेच जयंती निमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे मान्यवरच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन जगताप एस.सी. यांनी केले तर आभार प्रदर्शन सोंडगे के.बी.यांनी केले. यावेळी शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थीनी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निराधारांच्या मानधन प्रश्नावर आक्रोश मोर्चा

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):-** दिवाळीपासून निराधारांच्या बँक खात्यावर एकही रूपया जमा नाही. त्यांना मानधन मिळाले नाही. याच्या निषेधार्थ गुरूवार दि.२६ जून रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसील कार्यालयावर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट), भिमशक्ती यांनी काढलेल्या आक्रोश मोर्चाने अंबाजोगाई शहर दणाणले. निषेधाच्या घोषणा देत, झेंडे आणि फलक घेऊन शेकडो स्त्री, पुरूष व ज्येष्ठ नागरिक या मोर्चात सहभागी झाले.

अंबाजोगाई तालुक्यातील २७हजार निराधार हे त्यांच्या हक्काच्या अनुदानापासून वंचित आहेत. त्यामध्ये संजय गांधी निराधार, श्रावणबाळ निराधार, दिव्यांग बांधवांसाठी शासनाकडून दिले जाणारे मानधन हे मागील ९ महिन्यांपासून तहसिल प्रशासनाच्या दप्तर दिरंगाईमुळे मिळालेले नाही. या सर्व योजनेमध्ये नऊ महीन्यांपासून मानधन मिळत नसल्याने उपासमारीनिवडीसाठी रू.२९१,००० ची अट रद लाभार्थी असणारे बहुसंख्य लोक हे वयोवृध्द असल्यामुळे त्यांना तहसील कार्यालयामध्ये खेटे मारावे लागत आहेत. निराधार लोकांना मिळणारे मानधन नेमके कोणत्या कारणामुळे थकविले गेले आहे. याचे समाधानकारक उत्तर तहसिल कार्यालयाकडून मिळत नसल्यामुळे हा आक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) आणि भिमशक्तीच्या वतीने दोन स्वतंत्र निवेदने देण्यात आली. दोन ही निवेदनांत नमूद केले आहे की, संजय गांधी निराधार, श्रावणबाळ, दिव्यांग बांधवांना ३००० रूपये प्रति महिना मानधन वाढ करा, तहसिल कार्यालयाकडून वयोवृध्द लाभार्थी यांची केवायसी, डिबीटीच्या नांवाखाली होणारे हेलपाटे थांबवावे व जाचक अटी रद्द कराव्यात, शासन आपल्या दारी योजनेखाली



तहसिल कार्यालयामार्फत वयोवृध्द लाभार्थी ज्यांचे अंगठा (थंम्ब) लागत नाहीत. त्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन यादी तयार करून त्यांना तात्काळ लाभ द्यावा, संजय गांधी श्रावणबाळ योजनेमध्ये निकष करून ती रू.५०,००० पर्यंत करावी या मोर्चाचे आयोजन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट), भिमशक्ती संघटना यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी मोर्चेकऱ्यांचे नेतृत्व भिमशक्ती संघटनेचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय युवराज भुंबे, बीड जिल्हाध्यक्ष जीवन गायकवाड, भिमशक्तीचे बीड जिल्हा संघटक धीमंत राष्ट्रपाल यांनी केले. तर मोर्चाच्या यशस्वितेसाठी भिमशक्तीचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष सुमित आवाडे, मुक्ता पाडुळे, मिनाताई लोंढे, रेखा मस्के, मुक्ता पाडुळे, नितीन गोदाम, बादल तरकसे, विशाल बनसोडे, शंकरदादा उजगरे, शेरूभाई पठाण, लखन गायकवाड, राम गायकवाड, अमन कोकाटे यांनी पुढाकार घेतला.

## श्री नारायण मा. व उ. मा. विद्यालय येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी

**बीड (प्रतिनिधी):-** बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये राजर्षी छत्रपती शाह महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून माननीय संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवराव काळे अण्णा, संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. धर्मराज पौळ सर यांनी केले तर सूत्रसंचालन चव्हाण युवराज सर यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. अशोक घरत सर यांनी मानले. प्राचार्य अमोल काळे सरांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्याविषयी अतिशय महत्त्वाची अशी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. कार्यक्रमाला प्रा. मस्के जी. बी, इनकर बी .जे, शेख सर, चौधरी पी. बी, रकटे बी.आर, रकटे एन. पी, करपे सर, प्रा.सौ. भुतावळे बि. आर, प्रा. मस्के मॅडम, कदम एस. व्ही, पवार पी. एल, प्रा. मुरमुडे ए. एन, उपस्थित होते. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# तलाठी, ग्रामसेवक अन् कृषी सहाय्यक सज्जावर नसल्याने शेतकऱ्यांची कामे रखडली

**बीड (प्रतिनिधी):-** तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक हे तीनही प्रमुख अधिकारी सज्जावर येत नसल्याने शेतकऱ्यांची शेतीसंबंधीची कामे रखडली आहेत. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने या ठिकाणी संबंधित अधिकारी नेमावेत. अनेकवेळा तहसिल कार्यालय व पंचायत समितीमध्ये अनेकवेळा चकरा मारून शेतकरी त्रस्त झाले आहेत. त्यामुळे ग्रामसेवक व तलाठी व कृषि अधिकारी याचे खळेगावा येथे आठवड्यातून किमान दोन दिवस थांबून गावाचे कामकाज बघावे व जनतेचे समस्या जाणून घ्यावेत अशी मागणी गावकऱ्याच्या वतीने स्वाभिमानी शेतकरी संघटनेने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे बुधवारी लेखी निवेदनाव्दारे केली

आहे. याबाबत संघटनेचे जेष्ठ संघटक मच्छिंद्र कारभारी गावडे यांनी निवेदन दिले. त्यांनी म्हटले आहे की, खळेगाव येथे दि. २७ एपिल २०२३ पासून तलाठी व ग्रामसेवक व कृषि सहाय्यक तिन्ही अधिकारी या सज्जावर नसल्याने शेतकऱ्यांचे व गावकऱ्यांची कामे रखडली आहेत. तसेच सन २०१६ पासून शेतकऱ्यांचा विमा रखडलेला असून आता तो देण्यात यावा. ते पैसे शेतकऱ्यांना बी-बियाणे व शेतीचे मशागत करण्यासाठी उपयोगी येतील. तसेच खताचे भाव जास्त भावाने विकले जाते याचे नियत्रंण असावे, पेरणी होऊन पाऊस न झाल्यामुळे दुसऱ्यांदा शेतकऱ्यांना पेरणी करण्याची वेळ आलेली आहे. आहे. यंत्रणेने त्वरीत याची दखल घ्यावी. सन २०२३

पासून शेतकऱ्याचे अनुदान रखडले आहे, जे शेतकरी मयत आहे त्यांच्या वारसांना अनुदान रक्कम देण्यात यावी व शपथपत्र बॉन्डवर न घेता साध्या पेपरवर शपथपत्राअधारे रक्कम देण्यात यावी. तालुक्यातील प्रत्येक सज्यामध्ये, हा जनतेचा प्रश्न सोडविण्यात यावा अशी मागणीही निवेदनातून स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली. याची नोंद न घेतल्यास येत्या ७ जुलै पासून मौजे खळेगाव (ता. गेवराई) येथील मारोती मंदिरात बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल, त्याची जबाबदारी शासनाची असेल असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनातावर मच्छिंद्र गावडे, भाऊसाहेब बळकुंडे, गोपाल आहेर, अशोक भोसले यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सोलार कंपनीने शेतकऱ्यांना दिले अपुरे साहित्य; उर्वरित साहित्य देण्याची शेतकऱ्यांची मागणी

**केज (प्रतिनिधी):-** तालुक्यातील सावळेश्वर ( पैठण) परिसरातील तीन शेतकऱ्यांना रोटासोल कंपनी कडून सोलार कंपनीचे अर्धवट साहित्य दिले आहे. व उर्वरित साहित्याची मागणी करूनही हे साहित्य शेतकऱ्यांना देण्यास कंपनी कडून टाळाटाळ केली जात आसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

शासनाने मागेल त्याला सोलार योजना सुरू केली आहे. या योजने अंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना सोलार बसवण्यात आल्या मुळे व रात्रीच्या अंधारात पीकाला पाणी देण्यापासून शेतकऱ्यांची मुक्तता झाली, या संधीचा फायदा सावळेश्वर (पैठण) येथील शेतकरी उत्रेश्वर गोरडे यांचे शेतात ५ एचपी, जयश्री जगदाळे ५ एचपी बोअरवेल सोलार पंप, बाप्रमाणे या शेतकऱ्यांच्या शेतात ४ महिन्यापूर्वी रोटालोल कंपनीचा सोलार पंप मंजूर झाला आहे. तर पांडुरंग मस्के यांच्या शेतात ३ एचपी बोअरवेल, रेखा दिलीप गायकवाड ३ एचपी विहिर, व इतर शेतकरी यांना ही रोटासोल कंपनीचे सोलार पंप रश्र मंजूर झाले आहेत, या शेतकऱ्यांच्या शेतात सोलारचे स्ट्रक्चर बसविण्यात आले आहे. व त्याची सोलार प्लेट नंतर बसविण्यात येईल आसे त्यांना सांगण्यात आले. सोलार स्ट्रॅक्टचरच्या राखणीसाठी शेतकऱ्यांना आपल्या शेतात मुक्काम करावा लागत आहे., पंधरा दिवसांपूर्वी कंपनी चे कर्मचारी येऊन त्यांनी त्या स्ट्रक्चरवर सोलार प्लेट बसवून गेले. केवळ पाइप व सोलार पॅनल व सोलार पॅनल बसवण्याचे स्ट्रक्बर एवढेच साहित्य देऊन त्याचे फोटो काढून परत दोन दिवसांत येतोत आसे ते पसार झाले त्यानंतर ते अद्यापही परत आलेच नाहीत. योजना फसवी निघते की काय? सोलार मंजूर झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप मोटारसंच, व त्यास लागणारे स्टार्टर, रस्सी, व विज रोधक चिमनी हे साहित्य मिळालेले नाही, परंतु फोटो काढून नेल्यामुळे व काम पूर्ण झाले हे भासवून बील उचलण्याची घाई गुत्तेदाराने केल्यामुळे राज्यशासनाची शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली सोलार योजना ही फसवी नीघते कि काय? अशी आमच्या मनात निर्माण झाली आहे. अशी भावना पांडुरंग मस्के व उत्तरेश्वर गोरडे या शेतकऱ्यांनी बोलून दाखविली. व पाच दिवसांत सोलार पंपाचे उर्वरित साहित्य उपलब्ध करुन सोलार पंप न केल्यास गुत्तेदार व कंपनी विरुद्ध कायदेशीर कारवाई करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



# तपास पूर्ण होईपर्यंत क्लासेसला सील ठोका–चाकणकर

बीड (सरकार): बीड शहरातल्या नावाजलेल्या उमाकिरण शैक्षणिक संकुलामध्ये सुरू असलेल्या कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थिनी सोबत लैंगिक चाळे केल्याप्रकरणी तेथील संचालक विजय पवार आणि त्याचा साथीदार प्रशांत खाटोकर या दोघां विरोधात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर दोघेही फरार आहेत या प्रकरणाने बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ



उडाली असून पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आणि संतप्त भावना दिसून येत आहेत या गंभीर प्रकरणाची महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने गंभीर दखल घेत बीड जिल्हा पोलीस अधीक्षक यांना लेखी पत्राद्वारे तात्काळ सूचना करून दोषीन विरोधात कठोर कारवाई करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत त्याचबरोबर तपासाचा वस्तुनिष्ठ अहवाल तात्काळ महिला आयोगाला सादर करण्याच्या सूचनाही केल्या आहेत



महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी आज एक पत्र बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीतकावत यांना दिले आहे त्या पत्रामध्ये महाराष्ट्राचे महिला आयोगाचे अध्यक्ष म्हणतात

बीड जिल्ह्यात खाजगी क्लास मधील अल्पवयीन मुलीचा दोन प्राध्यापकांनी विनयभंग केल्याची घटना माध्यमातून समोर आली आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास पथक तयार करण्यात आली आहेत. राज्य महिला आयोगाने पोलिसांना सदर क्लासचे सीसीटीव्ही फुटेज तातडीने ताब्यात घेऊन आरोपींना अटक होईपर्यंत क्लासची इमारत सील करावी, या क्लासमधील इतर विद्यार्थिनींना विश्वासात घेऊन अजून अशा तक्रारी असल्यास त्याचा संवेदनशीलतेने तपास करावा असे निर्देश दिले आहेत. तसेच पीडित मुलगी आपल्या कुटुंबासोबत असून तिचे समुपदेशन करण्याबाबतही सूचना देण्यात आल्या आहेत.अशा आशयाचा ट्विट रूपालीताई चाकणकर यांनी काही केला आहे

## ऑलिम्पिक स्पर्धेत खेळाडूंनी अधिकाधिक सहभाग नोंदवावा- प्रा.शेळके



बीड (सरकार): बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी ऑलिम्पिक स्पर्धेत सहभाग नोंदवावा,असे मत शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी प्रा. जे. पी. शेळके यांनी व्यक्त केले.

जागतिक ऑलिम्पिक दिन जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे नुकताच (ता.२३) रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शेळके बोलत होते. या कार्यक्रमास जेष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात, जेष्ठ क्रीडा संघटीका जया बारगजे, श्री. अफरोज, श्री. पठाण, नितीन गर्जे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले तर आभार क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील यांनी मानले.

## लोकनेते विनायकराव मेटे यांना सदाभाऊ खोत यांच्याकडून श्रद्धांजली अर्पण

बीड (सरकार)महाराष्ट्र राज्याचे माजी कृषी राज्यमंत्री तथा रयत क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आ.सदाभाऊ खोत बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी शिवसंग्राम संस्थापक अध्यक्ष लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन घेतले. मी बीड जिल्ह्यात आल्यानंतर आज दिवसाची सुरुवात सर्वप्रथम लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांना अभिवादन करून केली असल्याचे सुतोवाच त्यांनी यावेळी केले.

लोकनेते विनायकराव मेटे साहेबांच्या संपर्कात आलेला प्रत्येक माणूस हा ते आपलासा करायचे राजकीय व्यासपीठावर ते अनेकांवर असूढ ओढायचे परखड मत मांड्याचे परंतु वयक्तिक मैत्री ते टिकवायचे असे दोस्तीच्या दुनियेतील राजा माणूस अशी त्यांची ओळख होती.



ज्यावेळी आम्ही सर्व घटकपक्ष म्हणून एकत्र आलो त्यावेळी आम्हा सर्वांना एकसंघ ठेवण्याचे काम हे त्यांनी केले महायुतीच्या सर्व बैठका या त्यांच्या पुढाकाराने आणि नियोजनात होत असत. मराठा आरक्षण प्रश्न विधीमंडळात अत्यंत पोटतिडकीने फक्त मेटे साहेबच मांडत होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे अरबी समुद्रातील स्मारक व्हावे यासाठी सर्वात प्रथम त्यांनी पुढाकर घेतला आणि त्याचा लढा उभा केला.मेटे साहेबांच्या जाण्याने कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे. परंतु शिवसंग्रामी मावळ्यांनी स्वतःला एकट समजू नये मी देखील शिवसंग्राम परिवाराचा सदस्य आहे त्यामुळे नेहमी मी शिवसंग्रामच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

## शॉटसर्किट मुळे घराला आग

### जिवनआवश्यक वस्तूसह कागदपत्रे जाळून खाक..!

बीड (सरकार) अंकुशनगर भागातील साई पंढरी लॉन्स जवळील घराला सकाळी ११.३० वा. दरम्यान विद्युत शॉट सर्किटमुळे आग लागली.या घरामध्ये पोलिस भरतीचा सराव करणारे विद्यार्थी भाड्याने राहत होते.

दुपारी क्लासला गेल्यावर अचानक विद्युत शॉटसर्किटमुळे घरात आग लागली.



या आगीत रेवण बंडू फाळके रा. बेलखंडी पा. जाधव अंगद नवनाथ, सुरवसे संतोष महादेव, सुरवसे ज्ञानेश्वर राजेभाऊ सर्व रा. जाधववाडी येथील रहिवासी आहेत.कपडे, बॅगा, महत्त्वाचे कागदपत्रे ( सनद, मार्कसीट, पदवी प्रमाणपत्र, आय टी आय प्रमाणपत्र ) रोख पैसे दहा हजारासह जीवन आवश्यक वस्तू जळुन खाक झाल्या आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले असून, किमान आमचे कागदपत्र शासनाने काढून द्यावेत अशी मागणी त्यांनी केली आहे.

## पर्यावरण रक्षणासाठी परळी भाजपाच्या वतीने वृक्ष लागवड

परळी (सरकार) हरित परळी,सुंदर परळी हा उद्देश समोर ठेवत पर्यावरण व पशुसंवर्धनमंत्री ना.पंकजाताई मुंडे व माजी खा.प्रीतमताई मुंडे यांच्या स्वप्नातील ग्रीन परळीचे स्वप्न साकार करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली परळी शहरात वृक्ष लागवडीची मोहिम राबविण्यात येत असुन या मोहिमेत महिलांचा लक्षणीय सहभाग आहे.

ना. पंकजाताई मुंडे व खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरण रक्षणासाठी वैद्यनाथ मंदिराच्या पाठीमागे वेताळ मंदिराच्या जवळील मेरुगिरी प्रदक्षिणा मार्गाच्या बाजुने गुरुवार दि.२६ जुन रोजी वृक्षारोपण करण्यात आल्यानंतर शुक्रवार दि.२७ जुन रोजी परळी शहरातील विविध रस्त्यावर वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी राणी लक्ष्मीबाई टॉवर परिसरात महिलांनी वृक्ष दिंडी काढत वृक्ष लागवडीचा संदेश दिला.या मोहिमेत वेगवेगळ्या जातीच्या ४,५०० वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्षलागवड



मोहिमेत भाजपाचे डॉ.शालिनीताई कराड,राजेंद्र ओझा,महादेव इटके,बंडू नाना कोरे, दिलीप नेहरकर,रमेश गायकवाड,विकास हलगे,श्रीनिवास राऊत,बाळू फुले, शिवाजीराव ठोंबरे,चंदाताई ठोंबरे, नंदा पुरभूज,सारिका कुरील,श्रीमती तारामती अग्रवाल,सौ सुरेखा मंत्री, विजयाताई दहिवाळ,चित्राताई देशपांडे,सुनिताताई बोडके,वैशालीताई चिद्रेवार,सौ मंगल देवशेटवार,सुलभा रुद्रवार, अर्चना रुद्रवार,सुरेखाताई मंत्री,सुनंदा निर्मळे,स्वातीताई चाटे, कीर्तीताई झंवर,मनीषाताई चौंडे, अंजूताई ओपळे,छायाताई ओपळे, तसेच परळी शहरातील प्रसिद्ध डॉक्टर सौ. वैशाली गंजेवार, डॉक्टर प्रज्ञा मुंडे, डॉक्टर पूजा तोतला, सरला उपाध्याय, डॉक्टर अर्चना मिसाळ, सोनम डॉक्टर सोनम जाजू, डॉक्टर देवशाला घुगे,डॉ.माया समशेट्टी,डॉ. हर्षा भायेकर,डॉ.सारिका घुगे,डॉ.सुनिता झंवर,सौ मंगल भोईटे,राजकन्या बंग,जनाताई पासेवार,सौ.रिया शेटे,सुजाता गडम,शालिनी बोधे,शांता स्वामी,अनुराधा मोदानी यांच्यासह परळी शहरातील विविध क्षेत्रातील महिला,सामाजिक कार्यकर्त्या, डॉक्टर मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

## लिंबागणेश येथे महसूल विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात संपन्न

बीड (सरकार): तालुक्यातील लिंबागणेश महसूल मंडळातील गावांसाठी महसूल विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अंतर्गत महाराजस्व समाधान शिबिर जिल्हाधिकारी विवेक जान्सन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवशंकर स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. २८ शनिवार रोजी सकाळी लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आयोजन करण्यात आले. प्रमुख उपस्थिती म्हणून नायब तहसीलदार आण्णासाहेब वंजारे, मंडळ अधिकारी महादेव जायभाये,ग्राम महसूल अधिकारी तलाठी लिंबागणेश गणपत पोतदार, तलाठी नारायण दराडे अंजनवती, तलाठी शेख गफुर लोणीघाट,तलाठी विपुल बनकर बेलखंडी पाटोदा,तलाठी अक्षय शिंदे बोरखेड,पुरवठा निरीक्षक श्रीराम वायभट,पुरवठा निरीक्षक संतोष मुळीक महसूल सेवक ललित काकडे आदींची उपस्थिती होती.

तहसील कार्यालयातील महसूल विभागाच्या संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, रेशनकार्ड, अपंग नोंदणी,वारस नोंदी, विवाह नोंदणी,जाती प्रमाणपत्र, रहिवासी दाखले, उत्पन्न प्रमाणपत्र,जातीचे दाखले वाटप, आधार लिंक,आदि विविध सेवा पुरविण्यात आल्या.ज्या अनुदान डीबीटी यावेळी बंद पडले होते अशा लाभार्थ्यांची डीबीटी कामे पूर्ण करण्यात आली.तसेच अग्रो स्टार फेरफार अदालत, जिवंत सातबारा मोहीम, नकाशावरील रस्ते खुले करणे इत्यादी बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. मंडळ अधिकारी जायभाये आणि तलाठी गणपत पोतदार यांनी कामकाज पाहून कार्यक्रम यशस्वी केला.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, जीवन मुळे,अँड.गणेश वाणी, संतोष भोसले,शेख अझीम, संतोष वाणी,भालचंद्र वायभट,सुंदरराव येडे,जितु निर्मळ,केशव गिरे, वैजनाथ भोसले आणि डॉ.गणेश ढवळे व पत्रकार हरीओम क्षीरसागर तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, शेतकरी महिला बहुसंख्येने लाभार्थी उपस्थित होते.यावेळी डीबीटीचे काम मोठ्या प्रमाणात झाल्याबद्दल लाभार्थ्यांनी व गावकऱ्यांनी महसूल प्रशासनाचे आभार मानले.

### सौ.के.एस.के. महाविद्यालयात छ.राजर्षी शाहू महाराज जयंती

बीड (सरकार): सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरी करण्यात आली. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य डॉ.संजय पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पुजन करण्यात आले. यावेळी बोलताना ते म्हणाले की,लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांमुळे पुरोगामी महाराष्ट्राची ओळख असून छत्रपती शाहू महाराज आरक्षणाचे जनक असून कमजोर माणसाला ताकद देण्याचे काम त्यांनी केले आहे. शिक्षण,वस्तीगृह, खेळ, जातीयव्यवस्था निर्मुलन, समाज जागृती यासारखी महान कार्य त्यांनी केले आहे असे विचार त्यांनी व्यक्त केले.

## सर्वसामान्य नागरीकांना सुविधा पुरविण्यासाठी नगर परिषदेने तत्पर रहावे – अमरसिंह पंडित

गेवराई (सरकार): नगरपरिषदे सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी काम करत असते नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत तसेच व्यापारी वर्गाला देखील सुविधा मिळाल्या पाहिजेत हाच हेतू ठेवून नगरपरिषद काम करत असते. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कसलेही राजकारण न करता सर्वसामान्यांच्या आणि व्यापारी वर्गाच्या सेवेसाठी तत्पर राहावे असे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. गेवराई नगर परिषदेच्या वतीने विविध विकासकामांचा शुभारंभ करताना ते बोलत होते.

गेवराई शहरामध्ये नगर परिषदेच्या वतीने रुपये १ कोटी ५० लक्ष रुपये किंमतीच्या व्यापारी



संकुल बांधकामाचा तसेच नविन बसस्थानक ते चार्वाक हॉटेल पर्यंत सिमेंट कॉक्रिट नाली बांधकामाचा शुभारंभ जयभवानी कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आला. यावेळी भवानी बँकेचे चअरमन बप्पासाहेब मोटे, माजी नगराध्यक्ष विनोद सौंदरमल, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजाभाई, माजी नगरसेवक जालिंदर पिसाळ, राधेशाम येवले, कृष्णा मुळे, मंजुर बागवान, विलास सुतार, आवेज शरीफ, सय्यद नजीब, उत्तमराव सोलाने, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपक आतकरे, संजय पुरणपोळे, बंटी सौंदरमल, धमपाल भोले, ॲड. योगेश पाटील, ॲड. गौतम कांडेकर, ॲड. मनोज हजारे, दत्ता दाभाडे, संतोष आंधळे, मानवी हक्क अभियानचे कडुदास कांबळे, मोहसिन बागवान, सुभान शेख, सुभाष गुंजाळ, विलास ठाकुर, दत्ता लाड, संतोष सुतार, वसीम फारोकी, जे.के. बाबुभाई, अक्षय पवार, संदिप मडके, रजनी सुतार, बाबा शेख, राजाभाऊ जवंजाळ, कमलाकर हातागळे, दादासाहेब चौधरी, खालेद कुरेशी, सतिष दाभाडे, विलास निकम, सुनिल सुतार, शाम सुतार, नविद मशायक, सादेक शेख, बाळराजे सोनकांबळे, अन्सारी आदींसह राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संगम येथे डॉ.संतोष मुंडे यांच्याकडून गिरी कुटुंबियांचे भेट घेऊन केले सांत्वन

परळी (सरकार): तालुक्यातील संगम येथील सोसायटीचे व्हाईस चेअरमन दत्तात्रय गिरी यांचे अल्पशा आजाराने मंगळवार दि. २४ जून रोजी दुःखद निधन झाले. यांच्या दुःखद निधनाबद्दल महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण मंत्रालय, उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांनी गिरी कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.



परळी तालुक्यातील संगम येथील संगम दाऊतपूर, जिरेवाडी सेवा सहकारी सोसायटीचे व्हाईस चेअरमन दत्तात्रय महाराज गिरी यांचे छत्रपती संभाजीनगर हॉस्पिटल येथे अल्पशा आजाराने प्राणज्योत मालवली. दत्तात्रय महाराज गिरी हे संगम दाऊतपूर, जिरेवाडी सेवा सहकारी सोसायटीचे व्हाईस चेअरमन होते. परळी तालुक्यामध्ये एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून ते प्रत्येक जणाच्याओठावर दत्तात्रय महाराज गिरी ओळख निर्माण केली अतिशय गुणी व्यक्तिमत्व म्हणून परिचित होते. दत्तात्रय महाराज गिरी यांच्या दुःखद निधनाबद्दल दिव्यांगाचे कैवारी तथा महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण मंत्रालय, उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांनी भेट घेऊन सांत्वन करून कुटुंबियांना धीर दिला. यावेळी हरिष नागरगोजे, हरिभाऊ गिराम,युनूस बेग,हनुमंत कामाळे व ग्रामस्थ उपस्थितीत होते.



## भारतीयत्वाचे शिक्षण देणे हे भाशिप्र संस्थेचे ध्येय आहे–निवासी उपजिल्हाधिकारी स्वामी

बीड (सरकार): भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा वर्धापन दिन २८ जून २०२५ व गुणवंत विद्यार्थी कौतुक सोहळा स्वा सावरकर शैक्षणिक संकुल बीड मध्ये आयोजित करण्यात आला.

प्रमुख मार्गदर्शक निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी मार्गदर्शन करताना संगितले की भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ही शिक्षण क्षेत्रात मोलाचे काम करणारी, राष्ट्र उभारणीसाठी योगदान देणारी संस्था आहे. भारतीयत्वाचे शिक्षण देणे हे या संस्थेचे ध्येय आहे. या संस्थेतून विद्यार्थांना ध्येय व आत्मविश्वास प्राप्त करता येते. सोशल मिडीया सारख्या गोष्टींपासून विद्यार्थांनी दूर रहावे असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय समारोप करताना डॉ. सुभाष जोशी यांनी सांगितले की, चरित्र निर्माण नैतिक अधिष्ठान यासाठी भाशिप्र संस्था निर्माण झाली. समाजात शिकवण देण्याचे महान कार्य ही संस्था करत आहे.

विद्यार्थानी आवडीचे क्षेत्र निवडून यात गुणवंत व्हावे. ही संस्था राष्ट्रभक्ती, शिस्त, निस्वार्थ सेवा या गुणांची रुजवण विद्यार्थ्यात करते. असे प्रतिपादन डॉ.जोशी यांनी केले.

यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व कौतुक करण्यात आले.

याप्रसंगी चंपावती शिक्षण संस्थेवर सभापती म्हणून निवड झाल्याबद्दल स्वा. सावरकर शैक्षणिक संकुलातर्फे मान्यवरांच्या हस्ते मा. प्रा. चंद्रकांत मुळे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

डॉ.सुभाष जोशी यांच्या हस्ते संस्था ध्वजारोहन, करण्यात आले. ध्येय पथ या मार्गदशिकेचे प्रकाशन , करण्यात आला.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड–४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड–४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही– वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)